विद्या प्रसारक मंडळ

# मुंगसाजी महाराज महाविद्यालय, दारव्हा

**पोस्टर कलर्स संगे करूया**
**रंगपंचमी साजरी**

*रंगतदार स्पर्धा*

## "रंग माझा वेगळा"

**दिनांक: २९ मार्च, २०२१**

आयोजक –

**भौतिकशास्त्र विभाग व राष्ट्रीय सेवा योजना**

**मुंगसाजी महाराज महाविद्यालय, दारव्हा**



**डॉ. संगीता ताई घुईखेडकर**
सचिव
विद्या प्रसारक मंडळ



**डॉ. विलास राऊत**
प्राचार्य
मुंगसाजी महाराज महाविद्यालय



**डॉ. किशोर हुरडे**
विभागप्रमुख
भौतिकशास्त्र विभाग



**डॉ. प्रशांत बागेश्वर**
आय. क्यू. ऐ. सी. समन्वयक



**डॉ. मनीष मोहरिल**
राष्ट्रीय सेवा योजना
अधिकारी



**कु. धनश्री कोठेकर**
प्रभारी प्राध्यापक
भौतिकशास्त्र विभाग

भौतिकशास्त्र विभाग व राष्ट्रीय सेवा योजना

# पोस्टर कलर्स संगे करूया रंगपंचमी साजरी

**'होळीच्या दिवशी होलिका राक्षशिनीचे दहन करण्यात आले होते'** ही आख्याईका संपुर्ण भारत देशात प्रसिध्द आहे. पुरातन काळापासून चालत आलेली ही प्रथा आजही खूप श्रध्दा:पूर्वक पाळण्यात येते. खरं तर या दिवशी वाईट गोष्टींची होळी पेटवून नकरात्मक्तेची त्यामध्ये आहुती द्यावी ही या सणामागची मुख्य भूमिका ! आणि दुसऱ्या दिवशी आपापसातील सगळे कलह विसरून एकमेकांना रंगमय शुभेच्छा देणे हा संकल्प, नाही का ??

होळीचा सण हा आपल्या प्रसन्नतेला, आपल्या आनंदाला विविध रंगांच्या माध्यमाने उधळण्याची, सर्वांशी मिळून मिसळून वागण्याची, परस्पर प्रेमभाव व एकोपा वाढवण्याची, दुर्भावना मिटवण्याची, गोडधोड वा इतर पक्वांनांचा स्वाद एकमेकांसोबत वाटण्याची प्रेरणा देत असतो.

मित्रांनो, मार्च महिना सुरू झाला रे झाला की प्रत्येकजण आतुरतेने वाट बघत असतो ती रंगपंचमीची! **'शेवट गोड व्हावा'** या मधुर विचारा सोबत ही रंगपंचमी फाल्गुन मास रंगवून जाते. परंतु COVID-19 च्या जागतिक संकटामुळे या सरत्या वर्षी ही रंगपंचमी बेरंगीच राहील की काय अशी धास्ती सगळ्यांच्या मनात नक्कीच आहे. पण तुम्हा सर्वांच्या उत्साहावर पाणी फेराल्या जाऊ नये म्हणूनच भौतिकशास्त्र विभाग राष्ट्रीय सेवा योजने अंतर्गत तुमच्यासाठी घेऊन येतोय एक रंगतदार अशी स्पर्धा

## "रंग माझा वेगळा"

## स्पर्धेची उद्दिष्टे

१. जागतिक महामारीच्या या सद्यस्थितीत विद्यार्थ्यांची रंगपंचमी अगदी झक्कास साजरी व्हावी.

२. विद्यार्थ्यांमधील सुप्त कलागुणंना वाव मिळावा व त्यांच्यात रंगसंगती बद्दलचे ज्ञान वृद्धिंगत व्हावे.

३. विद्यार्थ्यांना भविष्यातील प्रत्येक रंगपंचमी ही अतिशय उत्साहात साजरी करण्याची प्रेरणा मिळावी.

## नियमावली

१. विद्यार्थ्यांनी पोस्टर कलर्सनी स्वतःचा चेहरा रंगवून त्याचे zoom meeting app वर live एक छायाचित्र व्हॉट्सअँप ग्रुपवर टाकायचे आहेत.
२. फक्त आणि फक्त पोस्टर कलर्सचाच वापर करणे अनिवार्य आहे. दुसऱ्या रासायनिक रंगांचा वापर केल्यास त्या सहभागी विद्यार्थ्याला स्पर्धेतून बाद केले जाईल.
३. सोमवार, दिनांक २९ मार्च रोजी दुपारी ठीक ४.०० वाजता सर्व सहभागी विद्यार्थ्यांनी आपला चेहरा रंगवून खालील zoom link वर join व्हावयाचे आहे.
४. अमरावती येथील श्री. पियूष जोशी सर या स्पर्धेचे ऑनलाईन परीक्षण करणार आहेत.
५. प्रत्येक सहभागी विद्यार्थ्याला प्रमाणपत्र बहाल करण्यात येतील. तसेच सर्वोत्तम रंगकामाला प्रथम, व्दितीय व तृतीय क्रमांक देण्यात येतील.

# रंग माझा वेगळा

- विद्यार्थ्यांच्या सुप्तकलागुणांना वाव मिळण्याच्या अनुषंगाने भौतिकशास्त्र विभाग व राष्ट्रीय सेवा योजना यांनी संयुक्त विद्यमाने रंगपंचमीचे औचित्य साधत "रंग माझा वेगळा" या आगळ्यावेगळ्या स्पर्धेचे आयोजन केले.

- सदर स्पर्धेत सुमारे ४७ जणांनी उत्स्फर्तपणे सहभाग नोंदविला.

- विद्यार्थ्यांनी आपला चेहरा विविध रंगछटांनी रंगवून आपल्या कलेचे उत्कृष्ट सादरीकरण केले.

- स्पर्धेला परिक्षक म्हणून अमरावती येथील विन्सम अँडव्हरटाईझींग व फुलोर अकॅडमी चे संस्थापक मा. श्री. पियूष जोशी हे लाभले होते.

- काही विद्यार्थ्यांनी आपल्या कलेव्दारे चांगले संदेशही दिले.

- बि. एस्सी. भाग. १ च्या चि. प्रतिक इंगोले या विद्यार्थ्यांने "स्टे होम स्टे सेफ" असा संदेश देत प्रथम क्रमांक पटकाविला.

- या अप्रतिम स्पर्धेचा विद्यार्थी व प्राध्यापक वृंद अश्या सगळ्यांनीच आनंद घेतला.



**कु. धनश्री कोठेकर**
प्रभारी प्राध्यापक
भौतिकशास्त्र विभाग



**डॉ. किशोर हुरडे**
विभागप्रमुख
भौतिकशास्त्र विभाग



**डॉ. मनीष मोहरील**
राष्ट्रीय सेवा योजना
अधिकारी



**डॉ. विलास राऊत**
प्राचार्य
मुंगसाजी महाराज
महाविद्यालय

# स्पर्धकांच्या नावांची यादी

| अनुक्रमणिका | स्पर्धकाचे नाव | वर्ग |
|---|---|---|
| 1. | राजेश रामचंद्र राठोड | बि. कॉम. I |
| 2. | सुजित कैलास पवार | बि. कॉम. I |
| 3. | काजल संतोष राठोड | बि. कॉम. I |
| 4. | दिपाली सुभाष राऊत | बि. कॉम. I |
| 5. | रोहित गजानन येलसाटे | बि. कॉम. I |
| 6. | योगीराज रमेश राठोड | बि. ए. II |
| 7. | नितेश राजेश जाधव | एम्. कॉम. II |
| 8. | काजल राजू चव्हाण | एम्. कॉम. II |
| 9. | प्रतिक विवेक इंगोले | बि. एस्सी. I |
| 10. | प्रकाश भिमराव महानर | बि. ए. III |
| 11. | अविनाश जगन्नाथ बर्डे | बि. ए. III |
| 12. | जयश्री किशोर शेंदुरकर | बि. ए. III |
| 13. | श्रेया अशोक काळे | बि. ए. III |
| 14. | वैष्णवी रामकृष्ण जवके | बि. ए. III |
| 15. | आरती अनिल चव्हाण | बि. ए. III |
| 16. | जया नरेंद्र रेईलवार | बि. ए. III |
| 17. | प्रविण वसंतराव सुलथाने | बि. ए. III |
| 18. | नीरज राठोड | बि. ए. III |
| 19. | गणेश विजय राठोड | बि. ए. I |
| 20. | श्रीकृष्ण बाळू खंदलकर | बि. ए. I |
| 21. | मंजुषा भिमराव जाधव | बि. ए. II |
| 22. | दिव्या विलास अलोने | बि. एस्सी. II |
| 23. | देवयानी हरिदास बावने | बि. एस्सी. II |

| अनुक्रमणिका | स्पर्धकाचे नाव | वर्ग |
|---|---|---|
| 24. | पुनम किशोर गाढवे | बि. एस्सी. II |
| 25. | चेतना संजय दाढे | बि. एस्सी. II |
| 26. | अंजली अर्जुन मोहाळे | बि. एस्सी. II |
| 27. | अंकिता प्रकाश तारपे | बि. एस्सी. II |
| 28. | भाविका मंगेश डोळस | बि. एस्सी. II |
| 29. | स्वाती हिम्मत गावंडे | बि. एस्सी. II |
| 30. | नम्रता शरद दुधे | बि. एस्सी. II |
| 31. | काजल संजय रत्नपारखी | बि. एस्सी. II |
| 32. | पल्लवी खंडारे | बि. कॉम. I |
| 33. | अंबिका क्षिरसागर | एम्. कॉम. I |
| 34. | विजया संजय खोडे | एम्. कॉम. I |
| 35. | गणेश कैलाश होलगरे | एम्. कॉम. I |
| 36. | वैभव देशकरी | एम्. कॉम. I |
| 37. | प्रतिक अतुल कदम | एम्. कॉम. I |
| 38. | नितीन अशोक इंगोले | एम्. कॉम. I |
| 39. | निखिल रविशंकर नेमाडे | एम्. कॉम. I |
| 40. | जीवन ज्ञानेश्वर राऊत | एम्. कॉम. I |
| 41. | कपिल दामोदर किनकर | एम्. कॉम. I |
| 42. | गोपाल विष्णु महल्ले | एम्. कॉम. I |
| 43. | विशाल सुरेश पारधी | एम्. कॉम. I |
| 44. | गजानन सुरेश पारधी | एम्. कॉम. I |
| 45. | शंतनु मिरेश देशकारी | एम्. कॉम. I |
| 46. | आकाश बाबाराव मिरासे | एम्. कॉम. I |
| 47. | गोविंद पुरुषोत्तम राऊत | एम्. कॉम. I |

# निकाल पत्रिका


| *अनुक्रमणिका* | *स्पर्धकांचे नाव* | *वर्ग* | *पारितोषिक* |
|---|---|---|---|
| १. | चि. प्रतिक इंगोले | बि. एस्सी. भाग. १ | प्रथम पारितोषिक |
| २. | कु. काजल चव्हाण | एम्. कॉम. भाग २ | द्वितीय पारितोषिक |
| ३. | कु. अंबिका क्षीरसागर | एम्. कॉम. भाग १ | तृतीय पारितोषिक |
| ४. | कु. भारती राठोड | बी. एस्सी. भाग ३ | उत्तेजनार्थ पारितोषिक |

**परिक्षक: श्री. पियूष जोशी**


STAY SAFE
STAY.HOME







**विद्या प्रसारक मंडळ**
**मुंगसाजी महाराज महाविद्यालय, दारव्हा**

# प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते कि

**चि./कु. ....................(नाव)................ ......(वर्ग).....**

ह्याने / हिने भौतिकशास्त्र विभाग व राष्ट्रीय सेवा योजना यांनी रंगपंचमी निमित्त २९ मार्च २०२१ रोजी संयुक्तपणे आयोजित केलेल्या "**रं ग मा झा वे ग ळा**" या स्पर्धेत उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| कु. धनश्री कोठेकर<br>प्रभारी प्राध्यापक<br>भौतिकशास्त्र विभाग | डॉ. किशोर हरडे<br>विभागप्रमुख<br>भौतिकशास्त्र विभाग | डॉ. मनीष मोहरील<br>राष्ट्रीय सेवा योजना अधिकारी | श्री. पियूष जोशी<br>संस्थापक<br>विन्सम ॲडव्हरटाईझींग आणि फ्लोर अकॅडमी | डा. विलास राऊत<br>प्राचार्य<br>मुंगसाजी महाराज महाविद्यालय |

**विद्या प्रसारक मंडळ**
**मुंगसाजी महाराज महाविद्यालय, दारव्हा**

# प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते कि




**चि. प्रतिक इंगोले बि. एस्सी. भाग. १**

ह्याने भौतिकशास्त्र विभाग व राष्ट्रीय सेवा योजना यांनी रंगपंचमी निमित्त २९ मार्च २०२१ रोजी संयुक्तपणे आयोजित केलेल्या "**रं ग मा झा वे ग ळा**" या स्पर्धेत **प्रथम क्रमांक** पटकाविला.


| | | | | |
|---|---|---|---|---|
| कु. धनश्री कोठेकर<br>प्रभारी प्राध्यापक<br>भौतिकशास्त्र विभाग | डॉ. किशोर हरडे<br>विभागप्रमुख<br>भौतिकशास्त्र विभाग | डॉ. मनीष मोहरील<br>राष्ट्रीय सेवा योजना अधिकारी | श्री. पियूष जोशी<br>संस्थापक<br>विन्सम ॲडव्हरटाईझींग आणि फ्लोर अकॅडमी | डॉ. विलास राऊत<br>प्राचार्य<br>मुंगसाजी महाराज महाविद्यालय |

**दिव्य मराठी विशेष** • विद्यार्थ्यांच्या सुप्त कलागुणांना वाव आणि त्यांच्यात रंगसंगती बद्दलचे ज्ञान वृद्धिंगत व्हावे हा उद्देश

# मुंगसाजी महाविद्यालयात रंग माझा वेगळा स्पर्धा

प्रतिनिधी | दारव्हा

होळीचा सण हा प्रसन्नतेची, आनंदाला विविध रंगांच्या माध्यमाने उधळण्याची, सर्वांशी मिळून मिसळून वागण्याची, दुर्भावना मिटवण्याची, गोडधोड वा इतर पक्वान्नांचा स्वाद एकमेकांसोबत वाटण्याची प्रेरणा देत असतो. कोरोना जागतिक महामारीमुळे या वर्षी ही रंगपंचमी बेरंगीच राहील की काय अशी धास्ती सगळ्यांच्या मनात नक्कीच होती. म्हणूनच सर्व विद्यार्थ्यांच्या उत्साहावर पाणी फेरल्या जाऊ नये या अनुषंगाने भौतिकशास्त्र विभागाने आणि राष्ट्रीय सेवा योजनेने विद्यार्थ्यांसाठी ऑनलाइन रंग माझा वेगळा स्पर्धेचे आयोजन केले होते.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. व्ही. बी. राऊत, प्रमुख पाहुणे विभाग प्रमुख डॉ. किशोर हुरडे, भौतिकशास्त्र विभाग व उपप्राचार्य डॉ. सुनील चकवे उपस्थित होते. स्पर्धेला परीक्षक म्हणून अमरावती येथील विन्सम अॅडव्हरटाईझींग व फुलोर अकादमीचे संस्थापक पीयूष जोशी लाभले होते. तसेच आयक्यू एसी समन्वयक डॉ. प्रशांत बागेश्वर, प्रा. बोरकर, प्रा. कुमरे यांची उपस्थिती होती. सदर कार्यक्रमाकरिता विद्या प्रसारक मंडळाचे अध्यक्ष वसंत घुईखेडकर आणि सचिव डॉ. संगीता घुईखेडकर यांनी विशेष मार्गदर्शन केले. अशा प्रकारच्या स्पर्धा विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी अतिशय गरजेच्या आहेत,असे सांगून प्राचार्य डॉ. राऊत यांनी सर्व विजेत्यांचे आणि आयोजकांचे कौतुक केले. परीक्षकांचा परिचय रासेयो अधिकारी डॉ. मनीष मोहरील यांनी करून दिला. कार्यक्रमाचे संचालन प्रा. धनश्री कोठेकर तर आभारप्रदर्शन डॉ. भुरले यांनी केले.

## ४७ विद्यार्थ्यांचा सहभाग

जागतिक महामारीच्या या सद्यःस्थितीत विद्यार्थ्यांची रंगपंचमी अगदी साजरी व्हावी, विद्यार्थ्यांमधील सुप्त कलागुणांना वाव मिळावा आणि त्यांच्यात रंगसंगती बद्दलचे ज्ञान वृद्धिंगत व्हावे हे उद्दिष्ट समोर ठेऊन राष्ट्रीय सेवा योजना अधिकारी डॉ. मनीष मोहरील व भौतिकशास्त्र विभागात सहाय्यक प्राध्यापक धनश्री कोठेकर यांनी या स्पर्धेचे आयोजन केले होते. या स्पर्धेत तब्बल ४७ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला.







**स्टे होम स्टे सेफ असा संदेश देत प्रतीक इंगोले ठरला प्रथम क्रमांकाचा मानकरी**

बीएस्सी भाग १ चा विद्यार्थी प्रतीक इंगोले याने चेहऱ्यावर कोरोना व्हायरसचे पेंटिंग काढून स्टे होम स्टे सेफचा संदेश देत प्रथम क्रमांक मिळवला. काजल चव्हाण एमकॉम २, अंबिका क्षीरसागर एमकॉम १, भारती राठोड बीएस्सी भाग ३ यांनी द्वितीय, तृतीय व उत्तेजनार्थ पारितोषिके मिळवली.

लोकमत

# दारव्हा येथे ‘रंग माझा वेगळा’ स्पर्धा

लोकमत न्यूज नेटवर्क

**दारव्हा :** येथील मुंगसाजी महाराज महाविद्यालयात ‘रंग माझा वेगळा’ या स्पर्धेने रंगपंचमी उत्साहात साजरी करण्यात आली.

कोरोनामुळे यावर्षी रंगपंचमी बेरंगीच राहील की काय, अशी धास्ती सगळ्यांच्या मनात होती. मात्र, भौतिकशास्त्र विभागाने व राष्ट्रीय सेवा योजनेने विद्यार्थ्यांसाठी ऑनलाईन ‘रंग माझा वेगळा’ ही रंगतदार स्पर्धा घेतली. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. व्ही. बी. राऊत होते. प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. किशोर हुरडे, उपप्राचार्य डॉ. सुनील चकवे उपस्थित होते. परीक्षक पीयूष जोशी होते. आय.क्यू.ए.सी. समन्वयक डॉ. प्रशांत बागेश्वर, प्रा. बोरकर, प्रा. ताई कुमरे यांची मुख्य उपस्थिती होती. कार्यक्रमाकरिता विद्या प्रसारक मंडळाचे अध्यक्ष वसंत घुईखेडकर, सचिव डॉ. संगीता घुईखेडकर यांनी विशेष मार्गदर्शन केले.

जागतिक महामारीच्या स्थितीत विद्यार्थ्यांची रंगपंचमी अगदी झक्कास साजरी व्हावी, विद्यार्थ्यांमधील सुप्त कलागुणांना वाव मिळावा आणि त्यांच्यात रंगसंगतीबद्दलचे ज्ञान वृद्धिंगत व्हावे, हे उद्दिष्ट समोर ठेवून राष्ट्रीय सेवा योजना अधिकारी डॉ. मनीष मोहरील, भौतिकशास्त्र विभागात सहायक प्राध्यापक धनश्री कोठेकर यांनी संयुक्तपणे या स्पर्धेचे आयोजन केले होते.

## मुलींनीच मारली बाजी





स्पर्धेत बी.एस्सी. भाग १ चा विद्यार्थी प्रतीक विवेक इंगोले याने आपल्या चेहऱ्यावर कोरोना व्हायरसची पेंटिंग काढून स्टे होम, स्टे सेफ, असा संदेश देत प्रथम क्रमांक पटकाविला. काजल राजू चव्हाण, अंबिका क्षीरसागर आणि भारती राठोड यांनी अनुक्रमे व्दितीय, तृतीय व उत्तेजनार्थ पारितोषिके मिळविली. प्राचार्य डॉ. राऊत यांनी सर्व विजेत्यांचे आणि आयोजकांचे कौतुक केले.

Hello Yavatmal
Page No. 3 Apr 05, 2021
Powered by: erelego.com

# ‘रंग माझा वेगळा’ स्पर्धेने रंगली रंगपंचमी

## चेहऱ्यावर रेखाटले कोरोनाचे चित्र; दारव्हा येथील ४७ विद्यार्थ्यांकडून ऑनलाइन जनजागृती

**सकाळ वृत्तसेवा**

दारव्हा, ता. ३१ : याही रंगपंचमीला उत्साहावर पाणी फेरल्या जाऊ नये, या हेतूने येथील एम. एम. महाविद्यालयाच्या वतीने विद्यार्थ्यांसाठी ऑनलाइन 'रंग माझा वेगळा' स्पर्धा आयोजित केली. स्पर्धेत कोरोनासंदर्भात विविध चित्रे तब्बल ४७ विद्यार्थ्यांनी स्वतःच्या चेहऱ्यावर रेखाटली. चेहऱ्यावर कोरोनाची चित्रे रेखाटीत कोरोनासंदर्भात जनजागृती करणारी ही स्पर्धा चर्चेचा विषय ठरली आहे.



**दारव्हा : चेहऱ्यावर कोरोना व्हायरसचे चित्रे काढीत 'घरी रहा, सुरक्षित रहा' असा संदेश देणारा स्पर्धक प्रतीक इंगोले.**

होळीचा सण हा आपल्या प्रसन्नतेला, आनंदाला विविध रंगांच्या माध्यमाने उधळण्याचा, सर्वांशी मिळून मिसळून वागण्याचा, दुष्ट भावना मिटविण्याचा, गोडधोड पक्वांनांचा आस्वाद घेण्याचा व एकमेकांसोबत वाटण्याची प्रेरणा देण्याचा सण आहे. या सणापासून विद्यार्थी याहीवर्षी वंचित राहू नये, विद्यार्थ्यांमधील सुप्त कलागुणांना वाव मिळावा, त्यांच्यात रंगसंगती बद्दलचे ज्ञान वृद्धिंगत व्हावे, तर दुसरीकडे कोरोनाच्या पार्श्वभूमीवर यावर्षीही विद्यार्थ्यांची रंगपंचमी बेरंग होऊ नये, म्हणून सदर 'रंग माझा वेगळा' ही स्पर्धा विद्यार्थ्यांसाठी घेण्याचे महाविद्यालयाच्या भौतिकशास्त्र विभाग व राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने ठरविण्यात आले. राष्ट्रीय सेवा योजना अधिकारी डॉ. मनीष मोहरील, प्रा. धनश्री कोठेकर यांनी सदर स्पर्धेचे आयोजन केले. विद्यार्थ्यांनीही आनंदाने सहभागी होत या स्पर्धेत रंगत आणली. कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून प्राचार्य डॉ. व्ही. बी. राऊत, तर प्रमुख अतिथी म्हणून डॉ. किशोर हुरडे, उपप्राचार्य डॉ. सुनील चकवे आदींची उपस्थिती होती. स्पर्धेसाठी परीक्षक म्हणून अमरावती येथील विन्सम ॲडव्हरटाईझींग व फुलोर अकॅडमीचे संस्थापक पियुष जोशी, डॉ. प्रशांत बागेश्वर, प्रा. बोरकर, प्रा. कु. कुमरे आदींचा समवेश होता. सदर स्पर्धेसाठी विद्या प्रसारक मंडळाचे अध्यक्ष वसंत घुईखेडकर, सचिव डॉ. संगीता घुईखेडकर यांनी मार्गदर्शन केले. या स्पर्धेत तब्बल ४७ विद्यार्थ्यांनी आपला सहभाग नोंदविला. स्पर्धेनंतर विजयी विद्यार्थ्यांच्या नावांची घोषणा करण्यात आली. बी एस्सी भाग १ चा विद्यार्थी प्रतीक इंगोले याने आपल्या चेहऱ्यावर कोरोना व्हायरसचे चित्र काढीत 'घरी रहा ,सुरक्षित रहा', असा संदेश देत प्रथम क्रमांक पटकाविला. एम. कॉम. च्या काजल चव्हाण यांनी द्वितीय, अंबिका क्षीरसागर हिने तृतीय, भारती राठोड हिने उत्तेजनार्थ पारितोषिके मिळविले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. धनश्री कोठेकर; तर आभार डॉ. संदीप भुरले यांनी मानले. स्वतःच्या चेहऱ्यावर कोरोनाची चित्रे रेखाटीत कोरोनासंदर्भात जनजागृती करणारी ही स्पर्धा तालुक्यात चर्चेचा विषय ठरली आहे. अनेक विद्यार्थ्यांनी यामध्ये ऑनलाइन सहभाग नोंदवीत रंगपंचमीचा आनंद लुटला.